# ११. बाल गुन्हेगारांना द्यावयाची वागणूक

लहान मुले ही चुकीच्या/अपुऱ्या संस्कारामुळे व त्यांच्या भोवतालच्या सामाजिक, सांस्कृतिक परिस्थितीमुळे गुन्हेगार बनतात त्यात त्या लहान मुलांचा क्वचितच दोष असतो. म्हणून त्यांना योग्य वागणूक व न्याय देण्याच्या दृष्टिने 'बाल न्याय अधिनियम, १९८६' मध्ये खालील तरतूदी आहेत :-

(१) बाल अपराध्यांना शिक्षण तसेच व्यवसाय प्रशिक्षण देऊन त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी विशेष गृहाची स्थापना करणे.

(२) बालगृहांमधील ज्या मुलांच्या विरुध्द अपराधांची चौकशी आहे, अशांना ठेवण्याकरिता निरीक्षण गृह स्थापन करणे.

(३) कोणताही पोलीस अधिकारी किंवा कोणताही मान्यताप्राप्त सामाजिक संघटनेचा सदस्य, ज्याला ते मुल उपेक्षित आहे असे त्याचे मत झाल्यास, त्या मुलाचा ताबा घेऊन त्यास बालन्यायालयासमोर आणण्याची तजवीज लवकरात लवकर करेल. उपेक्षित मुलाला बोर्डासमोर हजर करण्याची मुदत २४ तासांची आहे.

(४) पोलीस अधिकाऱ्यांनी तपास केल्यानंतर बालक उपेक्षित आहे असे मत झाल्यास, अशा बालकास वयाच्या १८ वर्षापर्यंत, मुलगी असल्यास वयाच्या २१ वर्षापर्यन्त बालसुधारगृहात सांभाळण्याकरिता ठेवण्यात येते.

(५) कोणत्याही अपराधाबद्दल बाल गुन्हेगारास मृत्यूदंड दिला जात नाही किंवा कैदेत ठेवता येत नाही.

(६) एखाद्या गुन्ह्यात बाल अपराध्यासोबत इतर प्रौढ अपराधी असल्यास त्यांचा खटला एकत्रित चालविता येत नाही.

(७) जी कोणतीही व्यक्ती बालकांना क्रुरतेने वागवेल, मारहाण करेल, उपेक्षा करेल, निराश्रित म्हणून सोडून देईल अथवा त्या बालकावर मानसिक व शारीरिक दबाव आणण्याचा प्रयत्न करील अशा व्यक्तीस सहा महिने कैद किंवा दंड किंवा दोन्ही करण्याची कायद्यात तरतूद आहे.

(८) जी कोणतीही व्यक्ती भीक मागण्याकरिता लहान मुलांना प्रोत्साहित करेल किंवा भीक मागण्यासाठी म्हणून नोकरीवर ठेवेल, अशा व्यक्तीला ३ वर्षेपर्यन्त कैद किंवा दंड किंवा दोन्ही करण्याची कायद्यात तरतूद आहे.

(९) बालकास दारू व मादक द्रव्य पाजणा-या इसमास ३ वर्षेपर्यन्त शिक्षेची तरतूद आहे.

(१०) बालकास नोकरीमध्ये ठेवून त्याच्या नोकरीचे पैसे स्वत:जवळ ठेवून ते त्यास न देणा-या इसमास ३ वर्षेपर्यन्त शिक्षेची तरतूद आहे.

(११) बालगुन्हेगारांना सुधारण्यासाठी प्रोबेशन अधिकारी यांची स्पेशल होम, निरीक्षणगृह म्हणून तपासणी निरीक्षणासाठी नेमणूक केलेली आहे.